उप अधीक्षक भुमि अभिलेख (गट-ब राजपत्रित) संवर्गातील बदली आदेशातील पदस्थापनेत अंशत: बदल करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल विभाग
शासन आदेश, क्रमांक : बदली-०४२६/प्र.क्र.१३७/आस्था-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक : १७ ऑगस्ट, २०२६

संदर्भ : - समक्रमांकाचे दि.२२.०६.२०२६ रोजीचे शासन आदेश.

शासन आदेश:-

संदर्भाधीन शासन आदेशान्वये उप अधीक्षक भूमि अभिलेख, गट-ब संवर्गातील खालील अधिका-यांची स्तंभ क्र.३ येथे नमूद करण्यात आलेल्या पदावर बदलीने पदस्थापना करण्यात आली होती. ‘महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि प्रतिबंध अधिनियम, २००५’ मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने सदर बदलीने देण्यात आलेल्या पदस्थापनेत अंशत: बदल करून त्यांची सुधारीत पदस्थापना खाली दर्शविल्याप्रमाणे स्तंभ क्र.४ येथील पदावर करण्यात येत आहे.:-

अ.क्र	अधिका-याचे नांव	यापुर्वी देण्यात आलेली पदस्थापना	सुधारीत पदस्थापना
१	२	३	४
१	श्री.अमोल गणपत भोसले, उप अधीक्षक भूमि अभिलेख	कार्यालय अधीक्षक जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे	नगर भूमापन अधिकारी क्र.२, पुणे

२. श्री.भोसले यांना पदस्थापनेच्या पदावर रुजू होण्यासाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी. संबंधीत अधिकारी नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी कोणत्या दिनांकास रुजू झाले याबाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांनी शासनास doe6.rfd@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर कळवावे.

३. संबंधीत अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच म.ना.से. (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत, असे अर्ज प्राप्त झाल्यास, ते संबंधीत अधिकाऱ्यास मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जांची दखल घेण्यात येणार नाही.

४.   सदरहू बदली आदेशानुसार तात्काळ नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५.   सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६०८१७१५३६०४०६४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

ASHWINI BHIMRAO YAMGAR

Digitally signed by ASHWINI BHIMRAO YAMGAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department, 2.5.4.20=F0B627B3230194FA84BD0E5B4EB590E81C2C15CE998BA19F4825B4AC3EEE13CE, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1E31BE6F920A3D606925AB728A537257F35F1F0BE19B929C1B0DDCBA1E89366B, cn=ASHWINI BHIMRAO YAMGAR
Date: 2026.08.17 15:37:23 +05'30'

(अश्विनी यमगर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.रा.), पुणे.

प्रत:-

१) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
२) स्वीय सहायक, अप्पर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) सर्व उप संचालक भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
५) संबंधित अधिकारी-
    (द्वारा- जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांच्यामार्फत)
६) कार्यासन आस्था-६ संग्रहार्थ.